http://www.sgbauonline.com

B.Com. Part-I First Semester

# Optional Languages Marathi

P. Pages : 3

Time : Three Hours

**AT - 1316**

Max. Marks : 80

---

सूचना :- सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक.

1. 'भारतीय लोकशाहीचे भवितव्य काय?' या लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय लोकशाही आणि जातिव्यवस्थेसंबंधीचे कोणते चिंतन मांडले आहे? **10**

किंवा

'नवीन ग्रंथांची आवश्यकता' या पाठात लोकहितवादींनी कोणते विचार व्यक्त केले आहेत?

2. जोतीराव फुले यांनी शेती सुधारणे संबंधीचे कोणते विचार मांडले आहेत? **6**

किंवा

'भाषेच्या द्वारेच लोकांच्या जीवनातील अनेकविध प्रतीतींना अभिव्यक्ती लाभते' या विधानाची चर्चा करा.

3. 'सांजवात' या पाठातून आनंदीबाईंनी राजे सयाजीराव गायकवाड यांच्या स्त्री-शिक्षण विषयक कार्याची महती कशी कथन केली आहे? **10**

किंवा

'वेणु' या पाठात अल्पायुष्यातच वैधव्य प्राप्त झालेल्या स्त्री-जीवनाचे दुःख कसे व्यक्त झाले आहे?

4. बाबा आमटे यांनी तरुण पिढीला त्यांच्या बलस्थानांचा परिचय कसा करून दिला आहे? **6**

किंवा

'कवितेचा जन्म' या कथेत बाबुराव बागूलांनी दलित युवकाच्या मनाचा जीवघेणा कोंडमारा कसा प्रकट केला आहे?

5. कवी नारायण सुर्वे यांच्या 'शीगवाला' या कवितेचा आशय स्पष्ट करा. **10**

किंवा

लक्ष्मीबाई टिळक यांनी त्यांच्या कवितेतून कोणते विचार व्यक्त केले आहेत?

6. संत तुकारामांनी त्यांच्या अभंग रचनेतून प्रयत्नाचे महत्व कसे विशद केले आहे? **6**

किंवा

'हिरीताचं देनं घेनं' या कवितेत बहिणाबाई चौधरी यांनी कोणते शाश्वत जीवनसूत्र सांगितले आहे?

7. बातमी कशी लिहावी? हे सांगून वृत्तपत्राचे स्वरूप स्पष्ट करा. **10**

किंवा

'नभोवाणीसाठी लेखन' आणि 'दूरचित्रवाणीसाठी लेखन' यांत कोणता फरक आहे, ते सांगून दोनही लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.



http://www.sgbauonline.com

http://www.sgbauonline.com

**8.** खालील उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

जगभरातले देश काबीज करून पाश्चिमात्य देशांनी त्या ठिकाणी आपल्या वसाहती स्थापन केल्या; आणि त्या देशांच्या शोषणातून आपल्या आर्थिक विकासाचा पाया घातला. काबीज केलेल्या देशांतून कच्चा माल व स्वस्त श्रम आपल्या देशात न्यायचे आणि त्याचे पक्क्या मालात रुपांतर करून तो माल आपल्या वसाहतींमधून प्रचंड नफेखोरीने विकायचा, हे त्यांच्या वसाहतवादी धोरणाचे एक अंग होते. म्हणून काही मंडळी जागतिकीकरणाची प्रक्रिया लक्षात घेतांना 'जागतिक स्तरावरून होणारा आर्थिक व्यवहार' एवढ्याच मर्यादित अर्थाने या प्रक्रियेकडे पाहतात. तसे या प्रक्रियेकडे पाहता येत नाही.

कारण असा व्यवहार हजारो वर्षांपूर्वी सुद्धा व्हायचा. परंतु त्या व्यवहाराची आजच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील व्यवहाराशी तुलना करता येत नाही. जागतिक स्तरावरील प्राचीन काळचे व आजचे आर्थिक व्यवहाराचे स्वरूप सर्वस्वी भिन्न आहे. आजच्या जागतिकीकरणाची तुलना झालीच तर ती 1870 ते 1913 या कालखंडातील आर्थिक व्यवहाराशी काही प्रमाणात होऊ शकते. या काळात 'लेसे फेअर' हे तत्व मान्यता प्राप्त होते. या तत्वानुसार ह्या कालखंडात जागतिक स्तरावर अनिर्बंध व्यापार सुरु झाला. युरोपीय देशांनी आपापल्या साम्राज्यात भांडवल, वस्तू यांची गुंतवणूक केली. रेल्वे, रस्ते इत्यादी उद्योगात अन्य देशांतून आर्थिक गुंतवणूक होऊ लागली होती. भांडवल आणि वस्तूंच्या गुंतवणूकीच्या बरोबरीनेच मनुष्य शक्तीचे स्थलांतरही एका देशातून दुसऱ्या देशात होत होते आणि 1870 ते 1913 या कालखंडात म्हणजेच 1913 च्या आधी जगातील सर्व चलनांच्या मागे 'सुवर्ण परिमाणांची निश्चिती होती. परंतु 1914 ते 1918 या कालखंडात पहिले महायुध्द झाले आणि 'एक राज्य - एक राष्ट्र' या संकल्पनेचा जोर वाढू लागला. त्यामुळे मुक्त अर्थव्यवस्थेवर बरीच बंधने आली. 1918 नंतर Gold Standard चे तत्व अस्तित्वात असले तरी त्यात बरेच शैथिल्य आले; आणि 1920 मध्ये रशियात कम्युनिस्ट राजवट असल्यामुळे जागतिक अर्थव्यवहारावरील बंधने पुढे पुढे कडक होत गेली.

1930 च्या जागतिक मंदीने सुवर्ण परिमाणात आणखी शैथिल्य आले. त्यामुळे जुलै 1944 मध्ये अमेरिकेतील न्यू हॅम्पशायर परगण्यातील ब्रेटन वूडस् या गावी आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थापन कसे करता येईल? याचा विचार करण्यासाठी एक जागतिक परिषद बोलावली गेली. या परिषदेत जागतिक स्तरावरून काम पाहणाऱ्या / करणाऱ्या तीन यंत्रणांच्या निर्मितीचा विचार केला गेला. त्या यंत्रणा : World Bank, I.M.F. व GATT ह्या यंत्रणा होत. यातूनच ब्रेटन वूडस् पद्धती जन्माला आली. या पद्धतीनुसार जगातील सर्व देशांच्या चलनाच्या विनिमयाचा दर अमेरिकेच्या डॉलर बरोबर निश्चित करण्यात येऊ लागला. 1970 च्या दशकात ही पद्धती संपुष्टात आली आणि 15 ऑगस्ट 1970 रोजी अमेरिकेने त्या संबंधीची घोषणा केली.

- डॉ. अशोक नामदेव पळवेकर

प्रश्न :

1) वसाहतवादी धोरणाचे एक प्रमुख अंग कोणते होते? त्यासाठी त्यांनी काय केले? **2**

2) 'ब्रेटन वूडस्' या गावी जागतिक परिषद का बोलावली गेली? **2**

3) मुक्त अर्थव्यवस्थेवर बंधने का आलीत? 'ब्रेटन वूडस् पद्धती' केव्हा संपुष्टात आली? **2**

**किंवा**

वरील उतारा वाचून त्याचा सुमारे 100 शब्दांत सारांश लिहा.

**9.** अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) भारतीय संस्कृतीमध्ये अनेक शतकांपासून कोणत्या गोष्टीचे विकसन झाले आहे? **1**

2) जोतीराव फुले यांनी 'आमचे दयाळू सरकार' असे कोणाला म्हटले आहे? **1**

3) डॉ. आंबेडकरांनी कोणत्या बाबीला जातिव्यवस्थेचा प्राण असे म्हटले आहे? **1**

4) जुन्या समजुती मोडीत काढण्यासाठी लोकहितवादींनी कोणत्या गोष्टींची आवश्यकता प्रतिपादन केली आहे? **1**



http://www.sgbauonline.com

http://www.sgbauonline.com

ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

1) काही दिवसांनी ---------- आपल्या नवऱ्याबरोबर प्रवासास जावे लागले. 1
   1) यमुनेस 2) गंगेस
   3) गोदावरीस

2) आमच्या घरात त्यांचे बिऱ्हाड जितकी वर्षे होते; तितक्या वर्षांत एक दिवस सुद्धा तिने कधी -------- काहीं उसने पासने मागितले नाही. 1
   1) पसाभर 2) चिमूटभर
   3) शेरभर

3) त्याला एवढी घाई झाली की, तो हातातील पोरीला सांभाळीत -------- शोधू लागला. 1
   1) चष्मा 2) पेन
   3) कागद - पेन्सिल

4) त्याच्या साहसांना -------------- नसतात. 1
   1) मर्यादा 2) पंख
   3) सीमा

क) योग्य जोड्या जुळवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | ज्ञानेश्वर | अ) | प्रणय भावनेचा आविष्कार | 1 |
| 2) | केशवसुत | ब) | सबको पैसे ने खा डाला | 1 |
| 3) | नारायण सुर्वे | क) | धर्मांतर | 1 |
| 4) | सुरेश भट | ड) | ख्रिस्ती पुराण कल्पना | 1 |
| | | इ) | विराणी | |

ड) वाक्य पूर्ण करून लिहा.

1) वृत्तपत्र हे सर्वदूर पसरलेले आणि सर्व सामान्यांना परवडणारे असे ---------- आहे. 1

2) दूरवर लोकांपर्यंत पोहोचू शकणारे ---------- हे सुलभ माध्यम आहे. 1

3) संगणक व ---------- या दोन साधनांनी माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. 1

4) मराठीतही युनिकोडचा वापर करून ---------- लिहिणाऱ्यांची संख्या वाढत आहे. 1

************************



http://www.sgbauonline.com

http://www.sgbauonline.com

http://www.sgbauonline.com